जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने राज्यात राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत (Maharashtra Agricultural Competitiveness Project) पशुधन आधार सेवा (Livestock Support Services) उपघटक राबविण्यास शासकीय मंजुरी प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक एमएसीपी- २०११ /प्र.क्र ३५७/ पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३

**वाचा :-**

१. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग शासान निर्णय क्र. एमएसीपी- २०११/ प्र.क्र ३५७/ पदुम-४, दि. २८ सप्टेंबर, २०११.

२. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र.एमएसीपी-२०११/ प्र.क्र ३५७/ पदुम-४, दि. १४ जानेवारी, २०१३.

३. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. MACP/PIU/AHD/Pro Methods/२६/५९७/२०१३ पुणे दिनांक २१/९/२०१३

**प्रस्तावना :-**

जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने, राज्यात राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत (Maharashtra Agricultural Competiveness Project) पशुधन आधार सेवा (Livestock Support Services) उपघटक राबविण्यास, नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने वाचा-१ येथील शासन निर्णयान्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच वाचा- २ येथील शासन निर्णयान्वये पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर या जिल्ह्यात शेळी / मेंढी पालकांना / शेतकऱ्यांना आधार देणे व शेळ्या-मेंढ्यांची संघटीत बाजार व्यवस्था निर्माण करणे, तसेच, शेळीपालन- एक उच्चमुल्यवर्धित व्यवसाय प्रात्याक्षिके बीड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये राबविणे या कार्यक्रमाअंतर्गत पुरवठा करावयाच्या उस्मानाबादी जातीच्या पैदाशीच्या बोकडाची आधारभुत किंमत निश्चित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे यांचा जागतिक बँकेच्या पथकामार्फत दि. २२ एप्रिल ते ३ मे, २०१३ दरम्यान प्रथम मध्यावधी आढावा घेण्यात आलेला आहे. मध्यावधी आढावा अहवालानूसार पशुधन आधार सेवा उपघटकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या आनुषंगाने, खालील प्रमाणे शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन शुध्दीपत्रक :-**

१. वाचा येथील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील पृष्ठ क्र. २ वरील अनुक्रमांक 1 येथे नमुद पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापना करणे ही बाब पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणार नसल्यामुळे ती वगळण्यात येत आहे.

२. वाचा येथील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील पृष्ठ क्र. २ वरील अनुक्रमांक २ येथील ग्राम पशुसंवर्धन विस्तार संघ- पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती या अंतर्गत " प्रकल्प कालावधीत मोठया जनावरांचे २० बाजार व लहान जनवरांच्या ४ बाजाराच्या लाभ क्षेत्रातुन एकूण १८ जिल्हे परिच्छेद क मध्ये नमुद केलेले प्रति पाच गावाच्या ग्रामसमुहातुन एका कार्यकर्तीची निवड करण्यात यावी. सदर पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्तींना ३ दिवसांचे ग्राम पातळीवर प्रशिक्षण देण्यात यावे."

**या एवेजी**

सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात प्रथम व द्वितीय टप्यातील अहमदनगर, अमरावती, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदीया, बीड व सोलापूर या १० जिल्हयात निकषा प्रमाणे निवड झालेल्या कार्यकर्ती कार्यरत राहतील.

सन २०१३-१४ पासून अहमदनगर, पुणे, सांगली व सातारा या जिल्हयात शेळी मेंढी पालकांना आधार देणे / शेळया मेंढयाची संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे या कार्यक्रमात स्थापन केलेल्या व करावयाच्या प्रत्येक साधारण स्वारस्य गटामधून १ महिलेची पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती म्हणुन निवड करण्यात यावी. या कार्यक्रमात एकूण ६०० पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्तीची निवड करण्यात यावी.

शेळीपालन एक उच्चमुल्यवर्धित व्यवसाय प्रात्यक्षिके बीड व यवतमाळ जिल्हयात राबविणे या कार्यक्रमक्षेत्रात प्रति जिल्हा ५० याप्रमाणे एकूण १०० महिला कार्यकर्तीची निवड करण्यात यावी. निवड झालेल्या व निवड करण्यात येणाऱ्या महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तींना प्रकल्प कालावधीत प्रथम वर्षी ७, द्वितीय वर्षी ५ व तिसऱ्या वर्षी ५ दिवसांचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात यावे, **असे वाचावे.**

३. वाचा येथील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ मधील पृष्ठ क्र. ३ वरील अनुक्रमांक ३ येथील परिच्छेद व शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०१३ मधील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ येथे नमुद पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळी मेंढी पालकांना / शेतक-यांना आधार देणे व शेळया मेंढ्यांची संघटीत बाजार व्यवस्था निर्माण करणे येथे नमुद "प्रत्येक साधारण स्वारस्य गटातील समाविष्ट शेतकऱ्यांपैकी ३ शेतकऱ्यांना ५० % अनुदानावर प्रत्येकी १ याप्रमाणे प्रति स्वारस्य गटास एकूण ३ उस्मानाबादी जातीच्या पैदाशीचे बोकड याप्रमाणे एकूण ४५० पैदाशीच्या बोकडांचा पुरवठा करण्यात यावा. प्रति उस्मानाबादी पैदासक्षम बोकडाची अनुदान मर्यादा प्रति शेतकरी रु. ३७५०/- व प्रति स्वारस्य गट अनुदान मर्यादा रु. ११२५०/- इतकी असेल.

**या एवेजी**

प्रत्येक साधारण स्वारस्य गटातील समाविष्ट शेतकऱ्यांपैकी ५ शेतकऱ्यांना ५० % अनुदानावर प्रत्येकी १ या प्रमाणे प्रति स्वारस्य गटास एकूण ५ उस्मानाबादी जातीचे पैदाशीचे बोकड पुरवठा करण्यात यावे. ५ लाभार्थ्यांपैकी १ लाभार्थी गटामधुन निवड करण्यात येणारी महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती असेल. या कार्यक्रमांतर्गत एकूण ७५० पैदाशीच्या बोकडांचा पुरवठा करण्यात यावा. प्रति उस्मानाबादी पैदासक्षम बोकडाची उच्चतम अनुदान मर्यादा प्रति शेतकरी रु. ३७५०/- (प्रति बोकड खरेदी किंमत रु.३५००/- तसेच खाद्य व विमा रु. २५०/-) व प्रति स्वारस्य गट उच्चतम अनुदान मर्यादा (खाद्य व विमासह) बोकडाच्या प्रत्यक्ष किमतीच्या ५०% वा रु. १८७५०/- या पैकी, जी कमी असेल ती अनुदान मर्यादा अनुज्ञेय राहील. पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर या प्रत्येक जिल्हयात दोन बोकड मेळावे आयोजित करण्यात यावेत, **असे वाचावे.**

४. वाचा येथील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ मधील पृष्ठ क्र. ३ वरील अनुक्रमांक ४ येथील परिच्छेद व शासन निर्णय दिनांक १४ जानेवारी, २०१३ मधील शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ येथे नमुद शेळी पालन - एक उच्चमुल्यवर्धित व्यवसाय प्रात्याक्षिके बीड व यवतमाळ जिल्ह्यामध्ये राबविणे अंतर्गत " प्रात्यक्षिक धारकांना ५०% अनुदानावर उस्मानाबादी जातीचा पैदाशीचा बोकड (प्रति बोकड रु.३७५०/- अनुदान मर्यादा) व हस्तचलित चारा कटाई यंत्र (रु.२००० /- अनुदान मर्यादा) याप्रमाणे पुरवठा करण्यात यावा."

**या एवेजी**

प्रात्यक्षिक धारकांना ५०% अनुदानावर उस्मानाबादी जातीच्या पैदाशीच्या (प्रति बोकड रु.३७५०/- बोकड रु. ३५००/-तसेच खाद्य व विमा रु. २५०/- अनुदान मर्यादा) बोकडाच्या प्रत्यक्ष किमतीच्या ५०% (खाद्य व विमासह)/ वा रु.३७५०/- या पैकी जी रक्कम कमी असेल, ती अनुदान मर्यादा अनुज्ञेय राहील. प्रत्येक जिल्हयातील २५० प्रात्यक्षिक धारक शेळीपालक शेतकऱ्यांपैकी ५० शेळीपालक शेतकऱ्यांना ७५% अनुदान वर प्रत्येकी १ विद्युतचलित चारा कटाई यंत्र व प्रत्येकी ६ प्लॅस्टीक मुरघास बॅगचा पुरवठा करण्यात यावा. १ विद्युतचलित चारा कटाई यंत्र व ६ प्लॅस्टीक मुरघास बॅगच्या १ संचासाठी युनिट कॉस्ट रु. २००००/- असेल. सदर संच प्रत्यक्ष किमतीच्या ७५% वा रु. १५०००/- या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढया रक्कमेचे अनुदान अनुज्ञेय राहील. प्रत्येक जिल्हयातील २५० शेळीपालक शेतकरी प्रात्यक्षिक धारकांची उत्पादक संघटना स्थापन करण्यात यावी तसेच, प्रत्येक जिल्हयात दोन बोकड मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे, **असे वाचावे.**

५. वाचा येथील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ मधील पृष्ठ क्र. ३ वरील अनुक्रमांक ५ येथे नमुद जनावरांच्या आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करणे " या अंतर्गत प्रतिवर्षे २ शिबिरे सहा महिन्यांच्या अंतराने आयोजित करण्यात यावीत. आयोजित करावयाची शिबिरे कामधेनु दत्तक ग्राम या महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या योजनेच्या धर्तीवर आयोजित करण्यात यावीत. लाभ क्षेत्रातील किमान ३००-५०० पैदासक्षम जनावरे व शेळया / मेंढया असणाऱ्या गावातुन ग्राम संमतीने शिबीरांचे आयोजन करण्यात यावे."

**या एवेजी**

या अंतर्गत २० मोठया जानावरांचे बाजार व ४ शेळया / मेंढयांच्या बाजार कार्यक्षेत्रात शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. शिबीरांचे आयोजन महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या कामधेनु दत्तक ग्राम योजनेच्या धर्तीवर करण्यात यावे. जानावरांची संख्या कामधेनु दत्तक ग्राम योजनेच्या धर्तीवर असेल. या शिबीरांमध्ये शेळया / मेंढयांना प्राधान्य देण्यात यावे, **असे वाचावे.**

६. शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ मधील पृष्ठ क्र. ५ वरील पशुधन आधार सेवा या उपघटकाच्या अंमलबजावणी जागतीक बँक व पणन विभाग (नोडल विभाग) यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे करण्यात यावी. त्याचप्रमाणे, प्रकल्प समन्वय कक्षाशी (Project co-ordination Unit) या संदर्भात नियमितपणे संपर्क व समन्वय ठेवून या उपघटकांची अंमलबजावणी करण्यात यावी, **या परिच्छेदानंतर** " जागतीक बँकेच्या सहमतीने व सल्यानूसार सल्लागार सेवादाता यांची निवड करण्यात यावी." **असे वाचावे.**

७. शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ मधील पृष्ठ क्र. ७ वरील परिशिष्ट-२ **खालीलप्रमाणे वाचावे.** उपरोक्त अ.क्र.१ ते ६ येथे नमुद विविध कार्यक्रमासाठी सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत पशुधन आधार सेवा या पशुसंवर्धन विभागाच्या मंजुर उपघटक / उपघटकांसाठी उपलब्ध निधिचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

(रु. लाखात)

| अ. क्र. | मंजूर उपघटकांचे नाव | राज्य शासन हिस्सा | प्रकल्प हिस्सा | लाभार्थी हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राम पशुसंवर्धन विस्तार संघ- पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती | १०.०० | ९०.०० | ०.०० | १००.०० |
| २ | पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळीमेंढी पालकांना आधार देणे व शेळ्यामेंढ्यांची संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे. | ११.८५ | १०६.६५ | ११२.५० | २३१.०० |
| ३ | बीड व यवतमाळ जिल्ह्यातून शेळी एक उच्चमुल्यवर्धित व्यवसाय यांची प्रात्यक्षिके आयोजीत करणे | ३.८७५ | ३४.८७५ | २३.७५ | ६२.५० |
| ४ | जनावरांची आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे | ४४.६४ | ४०१.७६ | ० | ४४६.४० |
| ५ | पुणे येथील राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्थेचे बळकटीकरण करणे. | २.७० | २४.३० | ० | २७.०० |
| ६ | शेळीमेंढी पालकांना / शेतक-यांना आधार देणे / शेळ्या मेंढ्यांची संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे, शेळी एक उच्च मुल्यवर्धित व्यवसाय प्रात्यक्षिके राबविण्यासाठी सेवादाते व सल्लागार सेवादाता यांची निवड करणे | १०.०० | ९०.०० | ० | १००.०० |

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ७ येथे नमुद केलेल्या सुधारणेस / बदलास महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पासाठी स्थापित मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या आगामी सुकाणु समितीच्या बैठकीत कार्योत्तर मान्यता प्रदान करुन घेण्यात यावी

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,**

**(डॉ. एम.ए. पाचपिंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव, (कृषि व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ (५ प्रती).
आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम, कृषि विकास प्रकल्प, प्लॉट नं. एफ/ई ७८, पहिला मजला, भुविकास बँकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे- ४११ ०३७.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व).
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
जिल्हा कोषगार अधिकारी, (सर्व).
नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (पदुम-३)/ ( पदुम-१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.